नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ११/०५/२०२४ (शनिवार) सकाळ

---

## घरफोडी करणाऱ्या महिला टोळींचा पर्दाफाश
## एमआयडीसी बुट्टीबोरी पोलीसांची कारवाई

फिर्यादी नामे– वैभव प्रभाकर मोरतकर, वय ५७ वर्ष प्लॉट नं. ८ धंतोली नागपूर यांची एमआयडीसी बोरी परीसरात राजसी टेक्नोप्लास्ट नावाची कंपनी असुन त्या ठिकाणी प्लॅस्टीक चेअर व कॅरेट्स तयार केले जातात. मागील काही महिन्यापासुन सदरची कंपनी बंद स्थितीत असुन बंद होण्यापुर्वी उत्पादन केलेले प्लास्टीकचे साहित्य व इतर महत्त्वाचे साहित्य कंपनीच्या परिसरातील शेडमध्ये ठेवलेले होते. दिनांक ०२/०५/२०२४ रोजी दुपारी १२.३० वा. ते १५.०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपी कंपनी परीसरात शेडमध्ये प्रवेश करून कंपनीतील टुल बॉक्समध्ये ठेवलेले मोठया क्रमांकाचे पाने, इलेक्ट्रीक मोटार, लोखंडी स्पेअर पार्ट असे महत्त्वाचे साहित्य चोरून नेल्याचे तक्रारीवरून घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन एमआयडीसी बोरी पोलीसांनी तपासाला सुरूवात करून नमुद घटनेत आरोपी हे सांवगी मेघे वर्धा येथील महिला आरोपी असल्याचे गोपनीय माहिती व तांत्रिक तपासा दरम्यान निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक १०/०५/२०२४ रोजी त्या ठिकाणी जावुन एका महिला आरोपीस ताब्यात घेवुन त्याच्याकडे विचारपुस केली असता सुरूवातीला उडवाउडवीचे उत्तरे दिली. त्या दरम्यान तिला विश्वासात घेवुन अधिक विचारपुस केली असता तिने सांगितले की, तिच्या इतर ०३ महिला साथीदारासह नमुद गुन्हा केल्याचे सांगितले. तसेच गुन्हयातील चोरलेला मुद्देमाल हा शोएब समीर खान, रा. इतवारा जि. वर्धा यास विकल्याचे सांगितले. त्यानुसार चोरीचा माल विकत घेणाऱ्या आरोपीला सुद्धा ताब्यात घेवुन अटक करण्यात आली. त्याचेकडुन इलेक्ट्रीक मोटार, पाने व इतर साहित्य जप्त करण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. हर्ष पोद्दार पोलिस अधिक्षक सा. नागपूर ग्रामीण, मा. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक, मा. श्रीमती पुजा गायकवाड उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार श्री. राजीव कर्मलवार, पोउपनि राम खोत, पोहवा दीप पांडे, लक्ष्मण बन्ने, विनायक सातव, श्रीकांत गौरकर, पूजा इंगळे, निखील शेगावकर, उज्वल कोठे यांच्या पथकाने केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर